# ४. दोन भाऊ

१



एका शेतकऱ्याला दोन मुले होती. शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर दोघांनी जमीन वाटून घेतली व ते दोघे वेगवेगळे राहू लागले. ते जरी वेगळे झाले, तरी त्यांचे एकमेकांवर फार प्रेम होते.

२



शेतातील धान्याची मळणी झाल्यावर दोघांनी धान्य पोत्यांमध्ये भरून वेगवेगळ्या ठिकाणी ठेवले. दुपारी मोठा भाऊ शेतात आला.

३



यंदा चांगले पीक झाले. त्याच्या मनात विचार आला,'धाकट्याचं अजून लग्न झालं नाही. शेतीचे सर्व श्रम एकट्यालाच करावे लागतात. तेव्हा त्याला आपल्या वाट्यातून काहीतरी दिले पाहिजे.'

४



असा विचार करून मोठ्या भावाने आपल्या वाटणीच्या पोत्यांमधून पाच पोती छोट्या भावाच्या पोत्यांच्या थप्पीत ठेवून दिली.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कथा प्रसंगानुसार वाचून घ्यावी. या गोष्टीचे कथाकथन तसेच सादरीकरण करून घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये आलेल्या चित्रकथांचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक वाचन करून घ्यावे.

५



सायंकाळी राखणदारी करायला छोटा भाऊ खळ्यावर आला. त्याच्या मनात विचार आला, 'इतके धान्य आपल्याला कशाला हवे ? दादाला मुलंबाळं आहेत. मी एकटाच आहे. मला कमी धान्य मिळाले तरी चालेल; पण दादाला याची आवश्यकता आहे.'

६



असा विचार करून छोट्या भावाने आपल्या वाटणीच्या पोत्यांमधून पाच पोती मोठ्या भावाच्या पोत्यांच्या थप्पीत ठेवून दिली.

७



दुसऱ्या दिवशी खळ्यावर जाऊन दोघेही पाहतात, तो दोघांची पोती पूर्वीइतकीच. माझी पोती पूर्वीइतकीच वाढली कशी? त्यांच्या मनाला प्रश्न पडला.

८



नंतर दोघांनी एकमेकांकडे चौकशी केली. खरी हकिकत समजताच दोघांनाही गहिवरून आले.

९



तेव्हापासून ते दोघे एकत्र राहू लागले. त्यांचे एकमेकांवरील प्रेम पाहून लोक त्यांच्या बंधुप्रेमाची वाहवा करू लागले.

– **घनश्याम देशमुख**

**शब्दार्थ : वाटा** – हिस्सा. **राखणदारी करणे** – राखण करणे, सांभाळणे. **गहिवरून येणे** – कंठ दाटून येणे. **वाहवा करणे** – शाबासकी देणे, स्तुती करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. मोठ्या भावाने आपल्या वाटणीतील पाच पोती छोट्या भावाला का दिली ?**

**प्र. २. छोट्या भावाने आपल्याकडील धान्याची पाच पोती मोठ्या भावाला का दिली ?**

**प्र. ३. खालील घटना क्रमाने लिहा.**

(१) छोट्या भावाने पाच पोती मोठ्या भावाच्या पोत्याच्या थप्पीत ठेवली.
(२) दुपारी मोठा भाऊ शेतात आला.
(३) ते दोघे एकत्र राहू लागले.
(४) शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर दोघांनी जमीन वाटून घेतली.
(५) मोठ्या भावाने पाच पोती छोट्या भावाच्या पोत्यांच्या थप्पीत ठेवली.
(६) लोक त्यांच्या बंधुप्रेमाची वाहवा करू लागले.
(७) सायंकाळी राखणदारी करायला छोटा भाऊ खळ्यावर आला.

CL19EA

**उपक्रम :** ‘दोन भाऊ’ ही कथा बंधुप्रेमावर आधारित आहे. मित्रप्रेम व देशप्रेम यांवर आधारित कथा मिळवा. वाचा व वर्गात सांगा. वाचलेल्या कथांमधील आवडलेली वाक्ये लिहा.

**प्रकल्प :** वर्तमानपत्रे, मासिके यांमधून चित्रमय गोष्टींचा संग्रह करा. त्या गोष्टींची चिकटवही बनवा. अशा गोष्टी परिपाठात सांगा.

- **वाचा**

**पुढील घटना वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांवर चर्चा करा.**

राजूला फुलांची खूप आवड होती. त्याच्या आईबाबांनी घरी सुंदर बाग लावलेली होती. एक दिवस बागेत रोपे लावताना राजू आईला म्हणाला, ‘‘आई मी पण रोपे लावू?’’ आई म्हणाली, ‘‘तू जमवलेले रिकामे डबे घे आणि त्यात रोपे लाव.’’ राजूने रोपे लावली. रोज रोपांना पाणी घालू लागला. बघता बघता रोपांना आकर्षक व सुवासिक फुले लागली. राजू मनातून आनंदला.

एके दिवशी आई व राजू बागेत काम करीत असताना अमेयने राजूला आवाज दिला, ‘‘अरे राजू ! चलतोस ना विजयच्या वाढदिवसाला ?’’ ‘‘होय! होय! आलोच,’’ राजू म्हणाला. राजू तयार होऊन वाढदिवसाला जायला निघाला. आईला म्हणाला, ‘‘आई मी विजयच्या वाढदिवसाला भेटवस्तू काय देऊ ?’’ ती म्हणाली, तू लावलेले रोप विजयला दे. त्याला फुले खूप आवडतात.’’ राजूची भेटवस्तू बघून विजयच्या आईने राजूची पाठ थोपटली.

- **विचार करून सांगा.**

(१) राजूने विजयला दिलेली भेटवस्तू तुम्हांला आवडली का ? का आवडली ?
(२) तुम्हांला मित्रांच्या वाढदिवसाला कोणत्या भेटवस्तू द्यायला आवडतील ?
(३) तुम्ही आईबरोबर कोणकोणती कामे करता ?